International Journal of Advance and Applied Research
www.ijaar.co.in
ISSN – 2347-7075 Impact Factor – 8.141
Peer Reviewed Bi-Monthly
Vol. 6 No. 39 September - October - 2025

# ग्रंथालय व महाविद्यालय साठी इन्स्टिट्यूशनल रिपॉझिटरी

**डॉ. सचिन नारायणराव चोबे**
***ग्रंथपाल***
***के. के. एम. महाविद्यालय मानवत***
*Corresponding Author –डॉ. सचिन नारायणराव चोबे*
**DOI - 10.5281/zenodo.17283253**

***सारांश:***

*इन्स्टिट्यूशनला रिपॉझिटरी या संशोधन पर लेखांमध्ये अभ्यासकाने अगोदर ग्रंथालयांमध्ये कोणकोणत्या घटकांची माहिती आपण या अंतर्गत समावेश करू शकतो हे विशद केले आहे. जसे की ग्रंथालयात असलेला दुर्मिळ ग्रंथ साठा ,ग्रंथालयाने घेतलेले ओरिएंटेशन प्रोग्रॅम, ग्रंथालयास मान्यवरांनी दिलेल्या, भेटींचा अहवाल, ग्रंथालयास भेट दिलेल्या ग्रंथांचा अहवाल ,ग्रंथालयाने काही विशेष कार्यक्रम घेतले असतील त्याचा अहवाल, या सर्व गोष्टींचा अहवालव फोटो या अंतर्गत येऊ शकतो. तसेच महाविद्यालयाने देखील जे विविध कार्यक्रम घेतात. जसे की एखाद्या चर्चासत्र आयोजन असेल . मान्यवरांचे वक्तृत्व केलेले असेल , संबोधन असेल, राष्ट्रीय सेवा योजनेमधील कार्यक्रम असतील, वार्षिक स्नेहसंमेलनाचे कार्यक्रम असतील, महाविद्यालयातर्फे एखादा विशेष उपक्रम राबवला जात असेल जसे बक्षीस वितरण असेल, अहवाल असतील, महाविद्यालयास विविध मान्यवरांनी दिलेल्या भेटी असतील, तसेच NAAC Report , SSR Report असतील. आयएसओ चे मानांकन असते या सर्व गोष्टींचा अहवाल आपण इन्स्टिट्यूशन रिपॉझिटरी मध्ये टाकू शकतो.*

**प्रस्तावना:**

ग्रंथालय हे माहिती केंद्र आहे. यामध्ये ग्रंथ, नियतकालिके, संदर्भ ग्रंथ, ई बुक्स, ई जनरल, वर्तमानपत्रे, वार्षिक अहवाल, या सर्वांचा भरणा ग्रंथालयात असतो. ग्रंथालयामध्ये वाचकांना हवी असणारी माहिती मिळत असते म्हणूनच ग्रंथालयाचे महत्त्व अनन्य साधारण असते. याचाच एक भाग म्हणून इन्स्टिट्यूशनल रिपॉझेटरी ही संकल्पना उदयास आली. या संकल्पनेंतर्गत आपल्या संस्था अंतर्गत, ज्या काही महत्त्वाच्या घडामोडी, घडतात किंवा जे महत्त्वाचे कार्यक्रम घेतले जातात. अशा सर्व माहितीचा इन्स्टिट्यूशनल रिपॉझिटरी मध्ये जतन केले जाते. याचा फायदा असा असतो की वर्षानुवर्ष ही माहिती आपल्याला एका क्लिकद्वारे कळू शकते. म्हणूनच इन्स्टिट्यूशनल रिपॉझिटरी चे महत्व दिवसात दिवस वाढत आहे प्रत्येक ग्रंथापालाने हे कार्य केले पाहिजे जेणेकरून ग्रंथालय हे माहिती केंद्र आहे हे आणखीन चांगल्या प्रकारे सिद्ध होईल.

**इन्स्टिट्यूशनल रिपॉझिटरी मध्ये ग्रंथालया संदर्भात खालील गोष्टीचा समावेश होऊ शकतो:**

1. **ग्रंथालयाने घेतलेले ग्रंथ प्रदर्शने :** आज अनेको ग्रंथपाल खूप चांगल्या पद्धतीने कार्य करत आहेत. बरेच ग्रंथपाल वर्षातून पाच ते दहा ग्रंथ प्रदर्शन घेत आहे.

अशा एक पासून तर दहा-बारापर्यंत जितके ही ग्रंथ प्रदर्शने घेतले त्या ग्रंथ प्रदर्शनाचे जिओ टॅग मधले फोटो किती वाचकांनी विद्यार्थ्यांनी, प्राध्यापकांनी, त्या ग्रंथ प्रदर्शनास सहभाग नोंदविला याचा अहवाल तयार होतो. याची माहिती आपण जतन करून ठेवू शकतो. जेणेकरून अगदी पाच दहा वर्षानंतर पण आपण कोणते कार्यक्रम घेतले हे आपल्याला एका क्लिकवर कळेल.

**2. ग्रंथालयातील दुर्मिळ ग्रंथ संग्रह:** अनेक महाविद्यालयात पन्नास ते साठ वर्षापासून किंवा काही नवीन महाविद्यालयात देखील काही नागरिकांनी आणून दिलेले दुर्मिळ ग्रंथ संग्रहाचा साठा असतो. असे ग्रंथालयात उपलब्ध असलेल्या दुर्मिळ ग्रंथ संग्रहाची यादी ज्यामध्ये ग्रंथाचे नाव ,लेखकाचे नाव ,प्रकाशकाचे नाव, प्रकाशन वर्ष, इत्यादी माहिती आपण इन्स्टिट्यूशनल रिपोर्टर मध्ये नोंद करू शकतो. जेणेकरून वेगवेगळ्या वाचकांना, अभ्यासकांना प्राध्यापकांना कोणते दुर्मिळ ग्रंथ, कोणते उपलब्ध आहे याची माहिती तात्काळ कळेल.

**3. ओरिएंटेशन प्रोग्रॅम:** आज अनेक ग्रंथपाल आपल्या महाविद्यालयात येणाऱ्या नवीन वाचकांना ग्रंथालयाची ओळख व्हावी म्हणून ओरिएंटेशन प्रोग्राम आयोजित करतात. अशा या ओरिएंटेशन प्रोग्रॅम चे फोटो, किती विद्यार्थ्यांचा सहभाग नोंदवला होता. याची यादी या सर्व गोष्टी आपण इन्स्टिट्यूशनल रिपोर्टर मध्ये नोंद करू शकतो जेणेकरून आपण घेतलेल्या कार्यक्रमांची माहिती आपल्याला तात्काळ कळू शकेल.

4. ग्रंथालयाने आयोजित केलेले चर्चासत्र किंवा सेमिनार, ग्रंथालयाने काही चर्चासत्र व काही सेमिनार आयोजित केले असेल, तर या कार्यक्रमाचे फोटो, या कार्यक्रमाचा अहवाल या कार्यक्रमाची व्हिडिओ शूटिंग केली असेल, तर ती माहिती देखील मध्ये टाकू शकतो. जेणेकरून सविस्तर माहिती एका क्लिकवर आपल्याला कळेल.

**5. ग्रंथालयाने घेतलेले विशेष कार्यक्रम:** जसे की सन 2025 रोजी महाराष्ट्र शासनाने वाचन संकल्प महाराष्ट्राचा हा उपक्रम राबवला होता या उपक्रमांतर्गत ग्रंथ प्रदर्शनी भरवण्यात आली होती तसेच विद्यार्थ्यां करिता सुंदर अक्षर स्पर्धा आयोजित केली होती. तसेच निबंध स्पर्धा आयोजित केली होती. तसेच उद्बोधन पर पर भाषणाचे आयोजन केले होते. अशा सर्व कार्यक्रमांचे फोटो अहवाल आपण इन्स्टिट्यूशन रिपॉझिटरी मध्ये टाकू शकतो .जेणेकरून ही सर्व अनमोल माहिती सहजरीत्या आपल्याला जेव्हा पाहिजे तेव्हा मिळू शकते.

**6. भेट दिलेली ग्रंथ:** अनेको नागरिक, प्रतिष्ठित व्यक्ती, प्राचार्य, प्राध्यापक, विद्यार्थी, ग्रंथालयाला ग्रंथ भेट देत असतात. असे फोटो पण आपण इन्स्टिट्यूशन रिपोर्ट मध्ये टाकू शकतो .ही एक अनमोल ठेवा आपल्याला या पद्धतीने आपण जपू शकतो. याचा उपयोग आपण वार्षिक अहवाल तयार करण्यात होतो.

**7. मान्यवरांच्या भेटी:** ग्रंथालयाला अनेक व मान्यवर भेट देत असतात महाविद्यालयाचे कार्यक्रम होतात त्या ते प्रतिष्ठित व्यक्ती अभ्यास ग्रंथालयाला येऊन भेट देत असतात. अशा मान्यवर व्यक्तींचे फोटो त्यांनी ग्रंथालयात बद्दल दिलेला अभिप्राय आपण इन्स्टिट्यूशन रिपॉझिटरी मध्ये टाकू शकतो. जेणेकरून आपल्या ग्रंथालयाचे महत्त्व पण वाढेल व कोण कोणत्या प्रतिष्ठित व्यक्तींनी ग्रंथालयाला भेट दिले होत्या हे पण सारख्या NAAC टीमला किंवा विद्यापीठाच्या कमिटीला तात्काळ कळेल.

**8. ग्रंथालयातर्फे देण्यात येणारी पुरस्कार:** अनेक व ग्रंथालय आदर्शवाचक वाचक, आदर्श कर्मचारी, उत्कृष्ट ग्रंथपाल, असे पुरस्कार प्रदान करत असतात.

अशा पुरस्काराच्या कार्यक्रमाचे फोटो प्रशस्तीपत्र कार्यक्रमास अहवाल पण इन्स्टिट्यूशन रिपॉझिटरी मध्ये आपण टाकू शकतो.

**इन्स्टिट्यूशनल रिपोर्टर मध्ये महाविद्यालयाने घेतलेल्या खालील कार्यक्रमांचा किंवा उपक्रमांचा सहभाग आपण नोंदवू शकतो शकतो:**

1. **महाविद्यालय आयोजन केलेले चर्चासत्र:** अनेक महाविद्यालय वर्षातून दोन-तीन वेळा चर्चासत्र आयोजित करत असतात किंवा उदबोधन पर भाषणे पण आयोजित करत असतात. अशा सर्व कार्यक्रमांचे फोटो संपूर्ण अहवाल काही छोटे मोठे व्हिडिओ. हे इन्स्टिट्यूशनल डिपॉझिटरी मध्ये आपण टाकू शकतो.

2. **महाविद्यालयात झालेले शैक्षणिक कार्यक्रम:** शैक्षणिक वर्षाची सुरुवात झाली म्हणजे महाविद्यालय विविध कार्यक्रमाचे आयोजन करत असते जसे की हिंदी दिवस साजरा करणे, मराठी दिवस साजरा करणे, विज्ञान मंडळाचे उद्घाटन करणे, वाणिज्य मंडळाचे उद्घाटन करणे, तसेच विद्यार्थ्यांसाठी काही शैक्षणिक व्याख्यान कार्यक्रम पण महाविद्यालय आयोजित करत असते. अशा सर्व कार्यक्रमांचा अहवाल रिपोर्ट आपण इन्स्टिट्यूशन रिपॉझिटरी मध्ये टाकू शकतो. जेणेकरून कोणत्या शैक्षणिक वर्षात कोणते कार्यक्रम घेतले होते त्यासाठी प्रमुख पाहुणे कोण होते. त्यासाठी किती विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवला होता. याची सविस्तर माहिती आपल्याला कळू शकते.

**3.राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम:** राष्ट्रीय सेवा योजनेद्वारे वर्षांमध्ये मोठ्या प्रमाणात कार्यक्रमांचे आयोजन महाविद्यालय करत असते. तसेच वार्षिक शिबिराचे आयोजन पण महाविद्यालय करत असते. असे राष्ट्रीय सेवा योजनेमार्फत आयोजित केलेले कार्यक्रम मग स्वच्छता मोहीम असेल, साप्ताहिक कॅम्प मधील विविध कार्यक्रम असतील या सप्ताहात मान्यवरांनी दिलेल्या भेटी असतील. याचा संपूर्ण अहवाल फोटो आपण इन्स्टिट्यूशन रिपॉझिटरी मध्ये टाकू शकतो .

**4.वार्षिक स्नेहसंमेलन:** महाविद्यालयांमध्ये वार्षिक स्नेहसंमेलन आयोजन केले जाते . यामध्ये विविध कार्यक्रमाचे आयोजन होते. विद्यार्थी विद्यार्थिनींसाठी स्पर्धा होतात. संस्कृती कार्यक्रम होतात. अशा सर्व कार्यक्रमाचे व बक्षीस वितरणाचे फोटो व अहवाल आपण इन्स्टिट्यूशन रिपॉझिटरी मध्ये टाकू शकतो.

5. **पुरस्कार वितरण कार्यक्रम:** काही महाविद्यालय पुरस्काराचे आयोजन करत असतात जसे की शैक्षणिक वर्षांमध्ये प्रत्येक वर्गातून, विषयातून, प्रथम, द्वितीय आलेल्या विद्यार्थ्यांना बक्षीस वितरणाचे कार्यक्रम महाविद्यालय आयोजन करत असते . आशा कार्यक्रमांना मोठ्या मान्यवरांना बोलवून विद्यार्थ्यांना उदबोधित केले जाते. अशा कार्यक्रमांचा अहवाल फोटो पण इन्स्टिट्यूशन रिपोर्ट मध्ये आपण टाकू शकतो

6. **SSR Report and NAAC Report:** महाविद्यालयाच्या मानांकनामध्ये NAAC ला अनन्य साधारण महत्त्व आहे. अशा NAAC चा रिपोर्ट व SSR रिपोर्ट पण आपण टाकू शकतो.जेणे करून आपल्याला गुणात्मक गोष्टी तात्काळ कळेल. व कुठल्या सुधारणा करायचा हे पण तात्काळ करू शकेल.

7. महाविद्यालयाने आयएसओ मानांकन केले असेल, तर अशा ISO मानांकनांचा रिपोर्ट व प्रमाणपत्र देखील वर टाकू शकतो.

8. **महाविद्यालयास मिळालेले बक्षीस:** महाविद्यालयाला किंवा महाविद्यालयातील प्राध्यापकांना, कर्मचाऱ्यांना, जर काही विद्यापीठ स्तरावर, जिल्हा स्तरावर, राज्यस्तरावर, राष्ट्रीय स्तरावर, आंतरराष्ट्रीय स्तरावर, काही बक्षीस मिळाले

असेल. काही प्रमाणपत्र मिळाले असेल तर याचे पण फोटो, प्रशस्ती पत्राचे फोटो आपण इन्स्टिट्यूटेशन मध्ये टाकू शकतो. त्याचा उपयोग भविष्यात आपल्याला अनमोल फायदा होऊ शकतो.

**सारांश:**

इन्स्टिट्यूशन रेपोजिटरी हा माहितीचा मोठा साठा आहे. जेथे संबंधित संस्थेने ,संबंधित महाविद्यालयाने, संबंधित ग्रंथालयाने जे काही कार्यक्रम घेतले तर त्याचा अहवाल, त्याचे फोटो आपण टाकू शकतो. याचा फायदा हा होतो की दोन पाच वर्षांपूर्वी दहा वर्षांपूर्वी आपण कोणते कार्यक्रम घेतले होते त्यास कोण सन्माननीय सभासद उपस्थित होते कोणत्या क्रमांकास कोणते प्रमुख पाहुणे होते किती विद्यार्थी उपस्थित होते संबंधित कार्यक्रम कोणत्या वर्षी कोणत्या महिन्यात घेण्यात आला की संपूर्ण माहिती आपल्याला एका क्लिकद्वारे कळवू शकते. म्हणून इन्स्टिट्यूशनल रेपोजिटरी हे महाविद्यालयासाठी व ग्रंथालयासाठी एक वरदान आहे हे एक माहिती स्रोताचे कार्य करते .

**संदर्भ सूची :**

1. Kulkarni Ganesh, (2022) Advance Services in Libraries in the Modern era , Current Publication Agra.
1. Kumar P.S.G. Information Technology Basic B.R. Publication